# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ५८ बुधवार दि.०३ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मराठा आरक्षणाचा लढा यशस्वी ! जरांगे पाटलांनी जीआर स्वीकारत सोडले उपोषण ;जरांगे पाटील म्हणाले, आता गावाकडं चला

मुंबई : मुंबईतील आझाद मैदानावरील मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मोठं यश मिळालं. मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीनंतर सरकारने मागण्या मान्य करत एका तासात जीआर काढला. हैद्राबाद गॅजेटची तात्काळ अंमलबजावणी, सातारा गॅजेटचा अभ्यास करून महिन्यात अंमलबजावणी, सप्टेंबरअखेरपर्यंत आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घेणे तसेच शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी व आर्थिक मदतीचे आदेश होणार आहेत. मराठा आणि कुणबी एकच या शासननिर्णयासाठी दोन महिन्यांचा अवधी देण्यात आला. मागण्या मान्य झाल्याने जरांगे यांनी उपोषण सोडल्याची घोषणा केली.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आझाद मैदानावर सुरु असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला आज महत्त्वपूर्ण यश मिळाले.

राज्य सरकारच्या मराठा उपसमितीने हैदराबाद गॅझेटची तातडीने अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली असून, राज्यपालांच्या सहीनंतर तत्काळ शासन निर्णय जारी केला जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे मराठा समाजात आनंदाची लहर उसळली आहे.

मराठा आरक्षणाबाबत सुरु असलेले उपोषण सोडल्यानंतर जरांगे पाटलांच्या डोळ्यात आनंदाश्रू दिसत होते. तसेच त्यांच्या चेहऱ्यावर समाधानही दिसत होते. उपोषण सोडताना जरांगे पाटलांनी मराठा बांधवांना गावाकडे जाताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच मी आता रुग्णालयात जाणार आहे असंही त्यांना सांगितलं. पाच दिवसांच्या या उपोषणानंतर जरांगे पाटलांच्या बऱ्याच मागण्या मान्य झाल्या आहेत. उपोषण सोडल्यानंतर गणपतीची आरतीही करण्यात आली. तसेच मराठा आरक्षण उपसमितीनेही मराठा समाजाचे आभार मानले.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर केलेल्या आंदोलनाला मोठं यश मिळालं. राज्य सरकारनं तसा ऋठ देखील काढला आहे.



मनोज जरांगे पाटील यांनी याबाबत मोठी घोषणा केली आहे. उपोषण सोडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावं, अशी मागणी जरांगे यांनी केली होती. त्याचबरोबर 'उपोषण सोडण्यासाठी या, तुमचं आमचं वैर संपलं'. ही घोषणा केल्यानंतर काही क्षणातच सरकारी उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते ज्यूस घेऊन जरांगे पाटील यांनी त्यांचं उपोषण सोडलं.

आमचं म्हणणं एवढचं आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,अजित दादा आणि आमच्या मराठ्यांमध्ये एक कटुता आहे, ते जर इथं आले तर ती कटुता संपुष्टात येईल पण ते आले नाहीत तर ही कटुता कायम राहिल, असे म्हणत जरांगे पाटील यांनी उपोषण सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांना बोलावले होते. मात्र, विखे पाटलांच्या विनंतीनंतर अखेर जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण मागे घेतलं आहे.

मंत्रिमंडळ समितीचा प्रमुख मलाच सर्व अधिकार देण्यात आले आहेत, त्यामुळे माझ्यासह मंत्रिमंडळातील सदस्यही आमच्यासोबत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व अधिकार राधाकृष्ण विखे पाटील यांनाच दिले आहेत, त्यामुळे आपण उपोषण सोडावं अशी विनंती असल्याचे उदय सामंत यांनी म्हटले. त्यानंतर, मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलकांना विचारत राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते पाणी पिऊन उपोषण सोडले. तसेच, दमानं गाड्या चालवा म्हणत मुंबईतून आता गावाकडं जायचंय, घरी निघायचं असे आवाहनही केले.

## स्वातंत्र्य सैनिक नगर सोसायटीचे चेअरमन सुभाष निंबाळकर यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा दाखल

लातूर / प्रतिनिधी :- बहुचर्चित स्वातंत्र्य संग्राम सैनिक नगर गृहनिर्माण स हकारी संस्थेचे चेअरमन सुभाष गणपतराव निंबाळकर यांच्यावर विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात राजकुमार रेवप्पा माने व इतरांच्या तक्रारीवरुन,अनुसूचीत जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम,१९८९ च्या कलम ३(१)(क्यू) अन्वये गुरनं.०२२/२०२५ गुन्हा दाखल झाल्याने चर्चेला उधाण आले आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, स्वातंत्र्य संग्राम सैनिक नगर सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या, लातूरचे कायदेशीर रहिवाशी-सभासद राजकुमार रेवप्पा माने, राहुल गायकवाड व दीपक चाबूकस्वासरसह इतर तीन जणांनी दि.१४ जुलै २०२५ रोजी तक्रार दिली की, या संस्थेचे कायदेशीर सभासद असताना, सदर संस्थेचे चेअरमन सुभाष निंबाळकर यांनी सन २०२५-२०३० या कालाधीसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु केली. परंतु सदरची निवडणूक प्रक्रिया त्यांच्या राहत्या घरी सुरु केल्यामुळे त्याबाबतची कुठलीही माहिती सभासदांना झाली नाही. म्हणून आपण सहाय्यक निबंधक यांच्याकडे याबाबत विचारपूस केली असता, दि.१४ जुलै २०२५ रोजी त्यांनी आम्हाला सदरची मतदार यादी अवलोकनास दिली, त्यात चेअरमन निंबाळकर व संचालक मंडळाने मनमानी कारभार करुन, आमची नावे वगळली असल्याचे दिसून आले. यावरुन निंबाळकर यांनी आम्ही महार-मांग जातीचे असल्याने जातीय द्वेषापोटी सदर गृह निर्माण संस्थेत आम्हाला मतदानाचा अधिकार बजावता येऊ नये,तसेच संस्थेच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे राहता येवू नये म्हणून संस्थेच्या निवडणूकीच्या मतदार यादीमधून आमची नावे वगळून संस्थेची निवडणूक प्रक्रिया चालवण्याचा प्रयत्न केला. आम्हाला आमच्या संस्थेच्या सभासदाचे अधिकार बजावण्याचा आमचा संवैधानिक हक्क हिसकावून घेतला आहे. आम्हाला मानसिक, आर्थिक नुकसान पोहोचवण्याचा हा त्यांचा दुष्ट हेतू आहे. त्यांनी संस्थेच्या निवडणूकीसाठीची सभासद यादी बाबत लोकसेवकास खोटी माहिती पुरवून आमचा कायदेशीर अधिकारावर गदा आणला आहे. जे अनुसूचीत जाती-जमाती अन्याय अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ मधील तरतुतदीनुसार कोणत्याही लोकसेवकास खोटी किंवा खोडसाळ माहिती पुरवणे व त्यायोगे अनुसूचीत जाती व जमातीच्या एखाद्या व्यक्तीस इजा किंवा त्रास होईल अशा प्रकारे आपल्या अधिकाराचा वापर करण्यास त्या लोकसेवकास उद्युक्त करील तर तो गुन्हा असेल या तदतुदीचे उल्लंघन केले आहे. म्हणून माझी संस्थेचे चेअरमन सुभाष निंबाळकर व त्यांच्या संचालक मंडळाच्या विरोधात माझी तक्रार आहे,अशा आशयाची विवेकानंद चौक पोलीसं ठाण्यात दि. १४ जुलै २०२५ रोजी तक्रार देवून सदर संस्थेचे चेअरमन सुभाष निंबाळकर यांच्या विरोधात दाखल करण्याची मागणी केली होती. याबाबत वरिष्ठ अधिकार्यांच्या चौकशीनंतर अखेर आज दि.२ सप्टेंबर २०२५ रोजी अनुसूचीत जाती आणि अनुसूचीत जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम,१९८९ च्या कलम ३(१)(क्यू) अन्वये गुरनं.०२२/२०२५ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या लोकशाहीचे आपण काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

## बी. बी. मेश्राम १३० वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे वृत्तपत्र हे चळवळीचे प्रभावी साधन आहे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८५ व्या वर्धापन दिनानिमित्त प्रासंगिक विषयावर १३० वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा ३१ ऑगस्ट २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, २६ ऑगस्ट १९४० ला मुंबईच्या दामोदर हॉल मध्ये संपन्न झालेल्या सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वृत्तपत्र हे चळवळीचे प्रभावी साधन आहे. आपल्या सर्व चळवळीचे सार मूकनायक, बहिष्कृत भारत व जनता या स्वरूपात ते आपल्यासमोर उपलब्ध आहे. ज्यात त्यांनी जनता पत्र व भारत भूषण छापखाना मांजरीच्या पिलाप्रमाणे सांभाळल्याची जाणीव करून दिली होती. तर मग वर्तमानात आपली वर्तमानपत्राच्या अनुषंगाने काय स्थिती आहे? आपली परिवर्तनवादी विचाराची वर्तमानपत्रे का चालत नाहीत? याचा विचार करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ मार्च १९४० ला वृत्तपत्र चालविण्याची अनुषंगाने दिलेल्या दिशेनेर्देशाचे आपण पालन करीत आहोत काय? अशा प्रकारची विचारधारा आपल्या पत्रकातून प्रस्तुत होते काय? याची मीमांसा केली पाहिजे. आपल्यासमोर व शत्रुसमोर उपलब्ध असलेल्या शक्ती, न्यूनता, संधी व आव्हाने याचे तौलनिक विश्लेषण केले पाहिजे. जेणेकरून आपणास उपयोजना करता येतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, समता व प्रबुद्ध भारत यातून आपण प्रेरणा घेतली पाहिजे. जनतेचे जनमत तयार करण्यासाठी केवळ बातमीपत्र, न्युज पेपर वाचून चालणार नाही तर दृष्टिकोन पत्र व्ह्यूज पेपर वाचावे लागतील. म्हणून परिवर्तनवादी विचाराचे दैनिक, साप्ताहिक, पाक्षिके, मासिके वाचली पाहिजेत. सर्व प्रसार माध्यमांना वेगाने गतिमान केले पाहिजे. त्यांना वाचक वर्ग निर्माण करून देणे व आर्थिक पाठबळ देणे ही आपली जबाबदारी आहे. तळागाळापर्यंत विचारांचा प्रचार प्रसार केला पाहिजे. ती जबाबदारी आपण पार पाडली पाहिजे. आपण सर्वांच्या आशा, आकांक्षा आणि इच्छा पूर्णत्वास जावे असे वाटत असल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेल्या लोकशाहीचे आपण काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ऐतिहासिक काळात फोर्ड गाडीमध्ये प्रवास घडवून आणणारे सुरेंद्र सिंह उर्फ लाला जी चव्हाण म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मिलिंद कॉलेजच्या पायाभरणी संबंधाने कॉलेजला येण्यासाठी जुना बाजार ते मिलिंद कॉलेजपर्यंत त्यांच्या फोर्ड (इधऋ: १७८ :: बी वाय जी : १७८) या गाडीतून प्रवास घडवून आणला आहे. ती गाडी आजही त्यांच्याकडे सुस्थितीत उपलब्ध आहे. त्या गाडीत बाबासाहेबांनी प्रवास केला असल्याने त्यांनी ती गाडी सांभाळून ठेवली आहे. तसेच ज्या माईक मधून बाबासाहेब आंबेडकरांनी आपले वक्तव्य केले होते, तो माईक सुद्धा त्यांनी व्यवस्थित सांभाळून ठेवलेला आहे. त्या माईकला लाखो रुपयाची मागणी आली असताना त्यांनी तो कुणाला विकत दिलेला नाही. त्या काळातील फोर्ड गाडीला फक्त १५ ऑगस्ट आणि विद्यापीठाच्या नामविस्तार वर्धापन दिनाला बाहेर काढत असतात.



प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना दैनिक निळे प्रतीकचे संपादक रतन कुमार साळवे म्हणाले की, पत्रकारितेला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले असले तरी आज तो कसा चालत आहे? हे आपण सर्वजण पहात आहोत. बातमी कुठलीही असो ज्याच्या फायद्याची त्याला आनंद होतो तर ज्याच्या नुकसानीची त्याला दुःख होत असतो. सत्य मांडत असताना फार त्रास होत असतो.

याप्रसंगी पत्रकार डॉ. शेखर मगर म्हणाले की, उच्चवर्णीयांची वर्तमानपत्रे आपली दखल घेणार नाहीत म्हणून ३१ जानेवारी १९२० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक सुरू केले होते. ज्यात त्यांनी तुकारामाचे अभंग उद्धृत केले होते. उपेक्षित, शोषित, वंचिताचे प्रश्न मेनस्ट्रीम मीडियामध्ये मांडण्याचे काम करीत आहे. कमलबाई खरात म्हणाल्या की, बहुतांश मीडिया विकल्या गेलेला आहे. ज्यामध्ये कुत्रा हरवल्याची बातमी येते परंतु माणूस मेल्यावर सुद्धा त्याची बातमी येत नसते. अशोक मेश्राम म्हणाले की, २७ जानेवारीला लाखनी येथे संपन्न झालेल्या भीम बुद्ध मेळाव्यात आंबेडकरवादी विचारधारेची वृत्तपत्रे चालावित म्हणून प्रचार प्रसार केला होता. आर. जे. मुगदल म्हणाले की, लोकशाहीत प्रबळ विरोधी पक्षाच्या नेत्याची भूमिका महत्त्वपूर्ण असते. त्यांचे अस्तित्व कमकुवत होत चालले आहे. उद्योजक सशिकांत काळे म्हणाले की, आपण कोणीच लायक नव्हतो, त्यांना लायक बनविण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे. करिता आपण एकत्रितपणे संघटित राहिले पाहिजे. कुंदन लाटे म्हणाले की, रुग्णांच्या हक्क अधिकाराच्या अनुषंगाने बोलताना शहरात २२ धर्मादाय रुग्णालय आहेत. ज्यांनी दोन टक्के उत्पन्न हे असहाय्य रुग्णांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे. त्याची अंमलबजावणी करावी. एकट्या कमलनयन बजाज हॉस्पिटल कडे असा ७८ कोटीचा फंड उपलब्ध आहे. विलास कटारे म्हणाले की, मुक्या समाजाला बोलके करण्याचे काम मूकनायकने केले आहे. भीमराज बोर्डे म्हणाले की, उद्याचा येणारा काळ फार भयंकर असणार आहे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. उद्घाटक सुरेंद्रसिंह उर्फ लाला जी चौहाण यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. भीमराज बोर्डे यांनी 'बौधी वृक्ष झाला भीम' तर सुभाष वानखेडे यांनी 'समाजाचा काय रे गड्या, समाजाचे काय?' हे गीत प्रस्तुत केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके, प्रास्ताविक महादेव डांबरे यांनी तर आभार मिलिंद बागुल यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, ॲड. विलास रामटेके, इंजिनीयर किशोर पाटील, वामन कांबळे, एकनाथ पाखरे, रमेश भाई वानखेडे, प्रकाश उजगरे, विलास कटारे, उद्योजक शशिकांत काळे, रवींद्र वाकोडे, उद्योजक मिलिंद बागुल, अशोक कांबळे, पत्रकार डॉ. शेखर मगर, महादेव डांबरे, कुंदन लाटे, आर. जे. मुगदल, शुभम सौदागर, सुभाष वानखेडे, भीमराज बोर्डे, अरुण इंगळे, अशोक मेश्राम, कमलबाई खरात, कुसुमबाई डांबरे साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

## मानाच्या आजोबा गणपतीची माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्या हस्ते आरती उदगीरच्या गणेश मंडळांनी समाजाभिमुख उपक्रम राबवून सर्वांचे लक्ष वेधले : माजी मंत्री आ.संजय बनसोडे

उदगीर :- गेल्या ७ दिवसात उदगीर मतदार संघात अतिशय उत्साहाचे वातावरण होते. शहरातील विविध गणेश मंडळांनी समाजाभिमुख देखावे सादर करुन भक्तांची मने जिंकली. गणेश मंडळांनी विविध देखाव्यातुन आपल्या संस्कृतीचे दर्शन उदगीरकरांना दाखवून दिले. आपल्या उदगीरचा नवसाला पावणारा गणपती म्हणून पारकट्टी गल्लीचा आजोबा गणपती पंचक्रोशित प्रसिद्ध आहे. गेल्या ७ दिवसात मी विविध गणेश मंडळाला भेटी दिल्या अतिशय उत्साहाचे वातावरण होते. यामध्ये रक्तदान शिबीर, अन्नदान यासह विविध देखावे सादर केले आहेत. गणेश मंडळाच्या समाजाभिमुख उपक्रमांनी सर्वांचे लक्ष वेधले असल्याचे मत आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. यावेळी आ.संजय बनसोडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते मानाच्या आजोबा गणपतीची आरती करुन विसर्जन मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. यावेळी लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर धुगे, लातूर जिल्हा पोलीस अधिक्षक अमोल तांबे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, अप्पर पोलीस अधिक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी



गजानन भातलवंडे, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, पो.नि.राजकुमार पुजारी, पो.नि.दिलीप गाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले,शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, भाजपा शहराध्यक्ष अमोल अनकल्ले, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, उत्तरा कलबुर्गे, ॲड.वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, प्रा.मल्लेश झुंगास्वामी, संग्राम हुडगे,राजकुमार हुडगे, सूर्यकांत कुरुपखेळगे, गुरुनाथ धनशेट्टे, बाळासाहेब मरलापल्ले,प्रशांत मांगुळकर, राहुल अंबेसंगे, सनाउल्ला खान,आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, सन १९५० ला आजोबा गणपतीची स्थापणा करण्यात आली असुन गेल्या ७५ वर्षात या मानाच्या गणपतीने अनेक समाजाभिमुख उपक्रम राबवले आहेत. यावर्षी शासनाने डॉल्बीमुक्त गणेशोत्सव करुन समाजात एक नविन आदर्श निर्माण केला असल्याचे सांगुन पारकट्टी गल्ली येथील चौकी मठाला निधी देणार असल्याचे आ.बनसोडे यांनी जाहिर केले. आपला गणेशोत्सव हा शांततेत साजरा करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी गणेश भक्तांना केले.

## इंडिगोच्या विमानाला पक्षी धडकला; २७२ प्रवासी बचावले!

नागपूर : प्रतिनिधी नागपूरमध्ये इंडिगोच्या एका विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. इंडिगोचे विमान नागपूरहून कोलकात्याला जात होते. विमान ६ए८१२ने उड्डाण करताच, एक पक्षी हवेत आला आणि इंजिनला धडकला. उड्डाणानंतर काही वेळातच पक्ष्याची विमानाला धडक बसली यामुळे विमानाचा पुढचा भाग खराब झाला. परंतु वैमानिकाने हवेत यू-टर्न घेण्याचा निर्णय घेतल्याने नागपुरात आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.

इंडिगोचे ६ए८१२ विमान आज (२ सप्टेंबर) सकाळी ७ वाजून ५ मिनिटाने उड्डाण घेतली. आकाशात झेप घेताच एका पक्षाने धडक दिली. मिळालेल्या माहितीनुसार, पक्षी धडकल्याने विमानाच्या पुढच्या भागाचे नुकसान झाले. सर्व प्रवासी सुरक्षित असल्याचे सांगण्यात येत आहे.या विमानात माजी आमदार सुधाकर कोहळे, शेखर भोयर आणि काँग्रेस नेते नितीन कुंभलकर प्रवास करत होते.

विमानाच्या आपत्कालीन लँडिंगनंतर आता वरिष्ठ विमानतळ संचालक आबिद रुही यांचे विधान समोर आले आहे. ते म्हणाले की, इंडिगोच्या नागपूर-कोलकाता फ्लाइटवर पक्षी धडकण्याची शक्यता आहे. आम्ही या घटनेची चौकशी करत आहोत,अशी माहिती यावेळी देण्यात आली. यापूर्वी २ जून रोजी असाच एक प्रकार उघडकीस आला होता.

# संपादकीय

## मुंबई जिंकण्याची जबाबदारी तरुण शिलेदारावर

मुंबई आमची हे आहे देशाचा कारभार हाकणार्या भाजपचे ध्येय. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यासाठी समवेत घेतले जाईल; पण खरी जबाबदारी असेल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत नवे अध्यक्ष अमित साटम यांची!

अमित भास्कर साटम या तरुण आमदारावर भाजपने सर्वात महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. भगव्या एकीत बेकी झाली. २०१७ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप बरोबरीत पोहोचताच उद्धव ठाकरे यांनी ‘सावध ऐका पुढल्या हाका’ असा बोध घेत वेगळी वाट चोखाळली, असा अंदाज राजकीय निरीक्षक व्यक्त करत असतात. तो खरा असो का खोटा; भाजप – शिवसेना संबंध ताणले गेले आणि पुढे महाभारत घडले. या भवती न भवतीची राजकीय किंमत त्या त्या पक्षांनी चुकवली, पुढेही चुकवत राहतील. आज शिंदे यांच्या बंडाने आक्रसलेली शिवसेना (ज्याला आता उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना असे नाव निवडणूक आयोगाने दिले आहे) आणि विस्ताराची भूक लागलेल्या भाजपदरम्यान महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने प्रचंड घमासान होणार हे स्पष्ट दिसते आहे. मुंबई कुणाची हा प्रश्न धसास लागणार आहे. त्यासाठी दोन्ही बाजूंकडून साम, दाम, दंड, भेद अशा सर्व आयुधांचा वापर केला जाणार हे निश्चित. बाळासाहेब ठाकरे यांच्या वारशापासून तर मुंबई मराठी माणसाची इथवरचे सगळे मुद्दे ऐरणीवर येतील. शिवसेना हा मुद्दा भाजपला गौण होता, असे राजकीय विश्वाला दाखवायचे असेल तर मुंबई जिंकणे आवश्यक आहे. साटम या मावळ्यावर नियतीने सोपवलेली जबाबदारी त्यामुळेच फार मोठी आहे.

महाराष्ट्रात भाजपला व्यापक जनाधार देणार्या सर्वात महत्त्वाच्या नेत्याकडे दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्याकडे स्वीय सहायक म्हणून साटम काम पाहू लागले. भाजयुमोची जबाबदारी होतीच. ते पक्षात काम करत असतानाच मतदारसंघ बांधू लागले. नगरसेवक टर्म सुरू असतानाच ते अंधेरी पश्चिममधून निवडणुकीला उभे राहिले आणि २०१४ साली साटम निवडूनही आले. २०१४ साली विधानसभेच्या निवडणुका भाजप आणि शिवसेनेने वेगवेगळ्या लढवल्या होत्या. तरीही साटम निवडून आले. त्या मतदारसंघाचे पूर्वी प्रतिनिधित्व करणारे काँग्रेस नेते अशोक जाधव लोकप्रिय नेते आहेत. २०१४ साली त्यांना कमी मते पडली. पण शिवसेनेचे उमेदवार जयवंत परब यांच्यापेक्षा जास्त. २०१९ आणि केवळ काही महिन्यांपूर्वी झालेल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकातही अशोक जाधव यांनी ५० हजारांवर मते मिळवली. शिवसेना मात्र मागे पडली. या दहा वर्षांत मुंबईच्या उपनगरात भाजपला प्रचंड यश मिळू लागले. साटम यांचा मतदारसंघही याच परिसरातला. मुंबईतल्या गरीब–श्रीमंतांना भावणार्या योजना साटम यांनी सुरू केल्या.

सिव्हिल सोसायटी या नावाने ओळखला जाणारा नागरिकसमूह हा साधारणत: भाजपच्या हिंदुत्ववादाशी फटकून वागणारा वर्ग. पण या वर्गातील चळवळ्या समाजहितैषींना समवेत घेऊन साटम यांनी जुहूचा जगप्रसिद्ध समुद्रकिनारा कचरामुक्त केला, सौंदर्यीकरण योजना राबवल्या. महानायक अमिताभ बच्चन हे साटम यांच्या मतदारसंघाचे रहिवासी. त्यांना समवेत ठेवून साटम यांनी काही उपक्रम राबवले. मतदारसंघातल्या प्रत्येक सोसायटीतल्या नागरिकांची माहिती असलेले सॉफ्टवेअर साटम यांनी विकसित केले. ते मराठा समाजातले मराठी तरुण आहेत. या तिन्ही गोष्टींचे भाजपला कमालीचे महत्त्व. राज्याची सामाजिक परिस्थिती लक्षात घेता मराठा मते समवेत हवीत, मुंबई जिंकायची असेल तर मराठी चेहरा हवा. देशभर नेतृत्वात पिढीचा बदल घडवायचा असल्याने भाजपला तरुण चेहर्यांचा शोध असतो. स्थानिक आणि राष्ट्रीय अशा चाळणीत साटम बसले, अध्यक्ष झाले. त्यांना मोठे पद, अगदी शहर अध्यक्षपदही मिळू शकेल हे गेल्या काही वर्षांपासून गृहित धरले जात होते. तसे घडलेही. पद मिळाले की जबाबदारी वाढते, आव्हाने उभी राहतात. साटम यांच्या या उदयाने अस्वस्थ झालेल्या भाजपच्या बड्या नेत्यांची, आमदारांची संख्या कमी नाही. या सगळ्या मंडळींचे काम मोठे आहे. अतुल भातखळकर, पराग अळवणी, योगेश सागर, मनीषा चौधरी असे चांगले आमदार संघटनकौशल्य बाळगून आहेत. सुनील राणे यांना विधानसभा लढू दिली नाही. पण तेही प्रभावी नेते आहेत.

सहकाराच्या माध्यमातून भाजपला पडत्या काळात मविआ सत्तेत नसताना प्रचंड मदत करणार्या प्रवीण दरेकर यांना अध्यक्षपदाची संधी मिळेल असे बोलले जाई. ते मविआ सरकारच्या काळात विरोधी पक्षनेते होते. त्यांना सत्ता आल्यानंतर मंत्री केले नाही तेव्हापासून ते मुंबईचे अध्यक्ष होणार असे गृहित धरले गेले होते. मात्र ते मनसेतून, बाहेरून आले आहेत. त्यांना उपमुख्यमंत्री शिंदे यांचे विश्वासू सहकारी असलेल्या प्रकाश सुर्वे यांना निवडणुकीत हरवता आले नाही. भाऊ प्रकाश दरेकर यांनाही महापालिकेच्या निवडणुकीत पराभवाचे तोंड पाहावे लागले होते. त्यातच ते प्रमुख असलेल्या मुंबै बँकेसंबंधातील आरोपांची निकालात गेलेली प्रकरणे दिल्लीत पोहोचवली गेली. मुख्यमंत्र्यांच्या जवळचे असल्याने संधी नाकारली गेली, अशीही कुजबूज आहे. खरे कारण कोणतेही असो, अपेक्षित होते ते घडले नाही. दरेकर यांच्यावर अन्याय झाला असे काहींना वाटते. आता या सर्व बड्या नेत्यांना समवेत घेऊन साटम यांना अध्यक्षपद सांभाळत भाजपला मुंबई जिंकवून द्यायची आहे. मुंबईत भाजपने शिवसेनेसमोर दुय्यम भूमिका पत्करली. मुंबई, महाराष्ट्रात आम्ही मोठे भाऊ आणि देशाच्या स्तरावर तुम्ही मोठे भाऊ असे शिवसेनेचे भाजपला सांगणे असे. त्यात २०१४ नंतर मोदी पर्वात मोठा बदल झाला. पण त्यापूर्वी मुंबईत भाजपची मशागत किरीट सोमय्या, विनोद तावडे यांनी केली.

२०१० नंतर ३० च्या वर नगरसेवक तावडे यांच्या व्यूहरचनेने निवडून आले. समाजवादी पक्षाच्या मदतीने मधू चव्हाण विधान परिषदेवर पोहोचले. २०१७ साली या जागांत ५१ ची वाढ नोंदवत भाजप ८२ वॉर्डात निवडून आला. सेनेपेक्षा केवळ दोनने कमी. आता वॉर्डांचे सीमांकन झाले आहे. त्यात फार बदल नाही. शिवसेना फुटली आहे. उत्तर भारतीय मतदार काँग्रेसऐवजी भाजपकडे वळला आहे आणि स्थिरावलाही आहे. दुसरीकडे राज–उद्धव यांच्या संभाव्य युतीचा धोका आहे. तावडे यांच्यासमवेतच सक्रिय झालेल्या आशिष शेलार यांनी २०१७ साली मजबुतीने मुंबईचे पक्षप्रमुखपद सांभाळले. त्यानंतर मंगलप्रभात लोढा त्या पदावर गेले. मग पुन्हा शेलार, आता साटम. गेल्या महापालिका निवडणुकीत देवेंद्र फडणवीस मुंबईची सूत्रे सांभाळत होते. आताही ते असतीलच. त्यांनाही केंद्राला मुंबई जिंकून द्यायची आहे. बेकीचा हिशेब अद्याप बाकी आहे, असे भाजपला वाटत असेल तर मुंबईतील सत्तेचा लंबक ‘मातोश्री’वरून हलवण्याचे आव्हान साटम यांच्यासमोर आहे.

# शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ; मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

आपला भारत देश हा कृषिप्रधान आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या



पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल. हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी २४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

अभियानाचे उद्दिष्ट

या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे. ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

अभियानाचे ७ प्रमुख घटक

१. सुशासनयुक्त पंचायत – पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन
२. सक्षम पंचायत – आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (उङठ) व लोकवर्गणी
३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव – पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन
४. योजनांचे अभिसरण – मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी
५. संस्था सक्षमीकरण – शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी
६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय – रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण
७. लोकसहभाग व श्रमदान – ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान




खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रूपाने होईल. पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

पुरस्कार रचना :

राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल .

विभागस्तरीय पुरस्कार – प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख

जिल्हास्तरीय पुरस्कार – प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख

तालुकास्तरीय पुरस्कार :– प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख

विशेष पुरस्कार : प्रत्येकी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे. विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे. पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील. या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल. प्रत्येक ग्रामपंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल प्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल. अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्रामसभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे. राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई–लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

*********

(किरण वाघ, विभागीय संपर्क अधिकारी)

# रागावर नियंत्रण हाच आपला फायदा

प्रत्येकाला राग येत असतो त्याबाबत गेल्याच महिन्यात वाचण्यात आलेली बातमी अशी होती ,ती तुम्ही सुद्धा वाचलेली आहे. ती अशी की, भावा ,रागाला आवर नाहीतर जेलमध्ये सडशील ! तरुणाकडून हल्ल्या साठी स्क्रू ड्रायव्हर , चावी, लहान रोडचा वापर सहनशीलतेचा कडेलोट. हाणामारीच्या घटनात वाढ. कोल्हापूर : संगणक एआय च्या झटपट युगात आज तरुण शीघ्रकोपी बनत चालले आहेत. सहनशीलतेचा अंत झाल्या मुळे त्यांच्याकडून प्राणघातक हल्ले वाढत आहेत. एकमेकांचा काटा काढण्यासाठी खुनशी डावपेच आखले जात आहेत. भविष्याचा काहीच विचार न करता हे तरुण भरकट चालले आहेत .राग आल्यावर स्क्रू ड्रायव्हर चावी, लहान लोखंडी रॉडचे हत्यार बनवून भोसकण्यासाठी त्यांचा वापर होत आहे .

क्षणिक रागापोटी गंभीर गुन्हा केलेले १८ ते २५ वयोगटातील हजारो तरुण कारागृहात सडत आहेत. फास्ट फूडची सवय लागलेल्या तरुणांना आज रागही’ फास्ट’ येतो रागाच्या भरात ते भविष्याचा काहीच विचार न करता गुन्हा करतात. काही वेळा नशाबाजी केल्यानंतर त्यांचे हातून गुन्हे घडतात. गांजाच्या आहारी गेलेल्या तरुणांना तर आपण काय करतो याचे भान राहत नसल्याने ते मनमानी वागतात. शुद्धीवर आल्यानंतर त्यांना आपण केलेल्या गुन्हेगारी कृत्याची आठवण होते. किरकोळ वादातून घडलेल्या काही घटना पुढील प्रमाणे. चार दिवसापूर्वी भाविकांची कार दुचाकीला घासल्याच्या रागातून सहा तरुणांनी कारच्या चालकावर स्क्रू ड्रायव्हर हल्ला करून चालकाला रक्तबंबाळ केले.

याप्रकरणी शाहूपुरी पोलिसांनी सहा जणांना अटक केली. किरकोळ कारणावरून अशा प्रकारचा हल्ला झाल्यामुळे तो शहरात चर्चेचा विषय झाला होता. भाविकांचे वाहनावर हल्ला झाल्यामुळे काही सामाजिक कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. रांगोळी (तालुका हातकणंगले ) येथील ग्रामपंचायत सदस्य लखन बेनाडे हा वारंवार त्रास देतो, खोटे गुन्हे दाखल करतो, या कारणावरून सराईत गुन्हेगारासह असं दहा ते बारा जणांनी त्यांचे अपहरण करून मुंडके ,हातपाय धडा वेगळे करून खून केला. आज हे संशयित आरोपी कारागरात बंदिस्त आहेत. बेनाडे यांच्या त्रासाला कंटाळूनच त्यांनी रागाच्या भरात हे कृत केले. बागल चौक परिसरात पूर्ववैमानश्यातून प्रेम राजेश पोवार या तरुणास हर्ष बुचडे व जय हेगडे ( राहणार राजारामपुरी) यांनी गाडीची चावी डोक्यात मारून जखमी केले.

८ ऑगस्ट रोजी रात्री साडेनऊ वाजता हा प्रकार घडला. प्रेम याने राजारामपुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे .शिवीगाळ का करतोस, असा जाब विचारण्यास गेलेल्या तरुणास लोखंडी रॉड ने मारून जखमी केले उचगावजवळ ९ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री साडेआठ वाजता हा प्रकार घडला यामध्ये संतोष पंडित माने ( वय वर्ष ३९ राहणार उचगाव तालुका करवीर ) हा गंभीर जखमी झाला. तर मारहाण करणारे सुरज पाटील व तुषार फराकटे (राहणार दोघे उचगाव तालुका करवीर ) यांच्यावर गांधीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. कारागृह हाऊसफुल... कळंबा मध्यवर्ती कारागृहात सध्या कैद्यांची संख्या अतिरिक्त झाली आहे. या तरुण कैद्यांचीद संख्या अधिक आहे. किरकोळ गुन्ह्यात जामीन केल्या नसत्याचेही प्रमाण जास्त आहे.

राग अनावर झाल्यामुळे हातून गंभीर हाणामारी अथवा खून झालेले आरोपी आपल्या कृत्याचा पश्चाताप करत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने रागावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे .* नशाबाजी ,हिरोगिरी अंगलट दारू ,गांजा तसेच अन्य अमली पदार्थ सेवन करण्याचे ज्यांना लागले आहे अशा तरुणांकडून गंभीर स्वरूपांचे गुन्हे घडत आहेत. काही जण वर्चस्ववादातून आपल्या हिरोगिरी करत प्रतिस्पर्धी गुंडाशी नाहक नडतात. हिरोगिरी करण्याच्या नादात ते गुन्हेगारी कृत्यात अडकतात .गुन्हे अंगावर पडल्यानंतर ते यात वाहत जातात आणि मोठे गुन्हेगार म्हणून नावारूपाला येतात. अशा बातम्या कमी की काय म्हणून आज दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी वाचनात आली ती अशी

आला राग... काढली बंदूक... झाडल्या गोळ्या ! कोल्हापूर जिल्ह्यात बंदुकीचा गैरवापर वाढतोय ; आठवड्यात तीन घटना सुदैवाने जीवितहानी टळली.

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यात सध्या सर्वच प्रकारच्या परवानाधारक हत्यारांची संख्या ९ हजारांच्या जवळपास आहे. जिल्हा डोंगर–दऱ्याखोऱ्यांनी व्यापला असल्याने ग्रामीण भागातील अनेक लोकांनी वन्यप्राणी व चोर – दरोडेखोरांपासून संरक्षण म्हणून हत्यारे घेतले आहेत ; पण अशा हत्यारांचा वापर वैमनस्यातून आपल्या विरोधकाला संपवण्यासाठी केला जात आहे. जिल्ह्यात एकाच आठवड्यात गोळीबाराच्या दोन घटना घडल्या आहेत, तर पाचगावात बंदूक दाखवून दहशत माजवली ; मात्र या तीन घटनांत सुदैवाने जीवितहानी झाली नाही. शिये गावाजवळ दोन मित्रांमधील वाद विकोपाला गेल्यानंतर एकाने आपल्या कमरेला लावलेली बंदूक काढून मित्राच्या डोक्याला लावली. मित्राने त्याचा हात वर केल्यामुळे हवेत गोळीबार झाला. झटापटीत तीन राऊंड फायर झाले ; मात्र दैव बलवतर म्हणून या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. शनिवार दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी ही घटना घडली. शिरोली एमआयडीसी पोलिसांनी संबंधित व्यक्तीला अटक करून त्याची पिस्तूलही जप्त केली. पाचगावात दोघांनी आपल्या कारमधून रायफल काढून दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. याबाबत करवीर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. त्यानंतर सोमवार दिनांक १ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी पन्हाळा तालुक्यातील नावली गावात सेवानिवृत्त सैनिकाच्या बंदुकीतून गोळी उडाली. यात एक तरुण जखमी झाला. मांडीत गोळी लागल्यामुळे जीवावरील संकट टळले आहे. हा प्रकार नेमका कसा घडला याबाबत पोलीस तपास करत आहेत ; मात्र जिल्ह्यात सलग दोन वेळा गोळीबाराच्या घटना घडल्यामुळे चर्चेला उधाण आले आहे.

स्वसंरक्षणासाठी घेतलेल्या हत्यारांचा वापर रागाच्या भरात आपल्या शत्रूचा गेम करण्यासाठी केला जात असल्याने अशा परवानाधारक हत्यारांचा गैरवापर होत असल्याचे दिसून येते. रागाचा पारा वाढल्यानंतर माणूस आपल्याकडे उपलब्ध असेल त्या हत्याराचा वापर करतो. असाच प्रकार या दोन घटनांमध्ये घडल्याचे दिसून येते; पण वेळ चांगली म्हणून सुदैवाने जीवितहानी झाली नाही. * परवाने देणे बंद.....हत्यारांचा गैरवापर होण्याच्या घटना वाढत असल्याने कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या चार ते पाच वर्षात परवाना देणे बंद केले आहे. परवाना मागणीसाठी आलेले बहुतांश अर्ज पोलीस व जिल्हा प्रशासनाकडून नामंजूर केले जातात. परवाना मागणाऱ्यांचे कारण गंभीर असेल तर त्याची खात्री करूनच परवाना दिला जातो , मात्र हे प्रमाण अत्यल्प आहे.

* वरिष्ठांकडून गांभीर्याने दखल....

शिये येथील गोळीबार ,त्यानंतर पन्हाळा तालुक्यातील नावली गावातील गोळीबार या दोन घटनांची पोलिस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन संबंधितावर कारवाई केली आहे . पोलीस उपाधीक्षक तसेच पोलीस अधीक्षकांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. संबंधितावर कठोर कारवाईचे आदेश दिले. दोन्ही बातम्या वाचल्या नंतर आपल्या लक्षात आलेले आहे. राग आणि भीक माग या मराठी म्हणीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून रागावर नियंत्रण हाच आपला फायदा

**********

लेखक

जी.एस.कुचेकर पाटील

भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा

मो.न. ७५८८५६०७६१

# संघर्षासोबत कल्याणकारी कार्यक्रम राबवण्याची आवश्यकता - कर्मयोद्धा अंबादास शिंदे

### बहुजन समाजातील सप्तरत्नांचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ उत्साहात संपन्न

लातूर :- समाजामध्ये मोठ्या प्रमाणात सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येत आहे त्यात बहुजन समाजाच्या लोकांच्या समस्या ह्या अत्यंत महत्त्वाच्या आहे तसेच बहुजन समाज आज संघर्षामध्ये आपले जीवन जगत आहे त्यामुळे संघर्षासोबत कल्याणकारी कार्यक्रम राबविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोद्धा अंबादास शिंदे यांनी बोलताना व्यक्त केले. स्वातंत्र्य, अस्मिता, स्वत्व आणि स्वाभिमान जपणारा सर्वोच्च प्राधान्य देऊन क्रांतिकारी जाणिवेतून कार्यरत असलेल्या भारतीय दलित पँथर महाराष्ट्र राज्याच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त निवडक बहुजन समाजातील सप्तरत्नांचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ नालंदा बुद्ध विहार, लातूर येथे नुकताच संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर स्वागताध्यक्ष रंजीतदादा आचार्य, मार्गदर्शक प्रा. बापू गायकवाड, प्रमुख पाहुणे प्रा. शिवशरण हावळे आणि प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. संजय गवई यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मनोज कुमार सूर्यवंशी, वैभव कीर्तीकर आणि जालिंदर कांबळे यांनी पुष्पाने, धुपाने आणि दीपाने पूजा करून विधायक पंचशील व बुद्ध वंदनेने करण्यात आली. पुढे बोलताना कर्मयोद्धा अंबादास शिंदे म्हणाले की, भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून मागील पन्नास वर्षापासून मी बहुजनांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कायदेशीर आणि प्रशासकीय न्याय देण्याचे कार्य केले आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी चौदा कलमी कार्यक्रमाची निर्मिती केली होती त्याचा दुसरा टप्पा म्हणून महाराष्ट्रभर या चौदा कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे सुतवाच त्यांनी यावेळी केले. तसेच बहुजन समाजाने स्वकर्तृत्वाने



आणि प्रसंगी संघर्षाने आपले भारतीय संविधानाने दिलेले अधिकार प्राप्त करण्यासाठी आज सज्ज राहिले पाहिजे. समाजातील मराठे आणि बहुजन यांचा अत्यंत निकटचा सहसंबंध असल्यामुळे भविष्यामध्ये भिमोत्सवा सोबत शिवोत्सव आपण सर्वांनी मिळून साजरा केला पाहिजे असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी करून सुनील मांदळे संघर्ष योद्धा म्हणून सत्कार सुद्धा केला. या गौरव सोहळ्यामध्ये लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. श्रीकांत गायकवाड यांना शिक्षणरत्न, चलो बुद्ध की और अभियानाचे प्रणेते डी. एस. नरसिंगे यांना धम्मरत्न, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूरचे विशेष सरकारी वकील ॲड. लक्ष्मण शिंदे यांना न्यायरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर, उपकेंद्र परिसर, धाराशीव येथील लोककला व नाट्यशास्त्र विभागाचे डॉ. गणेश शिंदे यांना नाट्यरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागरी सहकारी पतसंस्था, लातूरचे संस्थापक अध्यक्ष ॲड. सुनील कांबळे सहकाररत्न, बहुजन हिताय वस्तीगृह, लातूरचे अधीक्षक धम्माचारी कल्याण दस्सी यांना पालकरत्न आणि प्रबोधनकार डॉ. वैभवी कांबळे यांना प्रबोधनरत्न पुरस्काराने सम्राट अशोकाच्या राज मुकुटमनीची प्रतिकृती, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल आणि बुके देऊन यथोचित सन्मान करण्यात आला यावेळी सर्व सप्तरत्नांनी आपापली मनोगते व्यक्त केली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाच्या व गुणवत्तेच्या आधारे यशस्वी होता आले पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी प्रा. बापू गायकवाड यांनी बौद्ध तत्त्वज्ञानाच्या आधारावरच आजचे ज्वलंत प्रश्न सुटण्यास मदत होऊ शकेल याची जाणीव करून दिली. प्रा. शिवशरण हावळे यांनी संघटनात्मक शक्तीचे महत्व अधोरेखित केले. पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष रंजीतदादा आचार्य यांनी कार्यक्रम आयोजनाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. यावेळी कुटिल राष्ट्रव लघुपट दाखविण्यात आला आणि निर्माते डॉ. मारुती गंगावणे यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण पुरस्कार प्राप्त सुफी सय्यद शमशोद्दीन यांनीही मनोगत व्यक्त केले आणि त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघर्ष योद्धा सुनील मांदळे यांनी यावेळी स्फूर्ती गीत सादर केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्किल अकॅडमीचे संचालक सुरज मांदळे यांनी केले तर आभार संघर्ष योद्धा सुनील मांदळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. राहुल डोंबे, प्रा. विशाल लामतुरे, स्नेहा पोटभरे, सहदेव काका, नालंदा बुद्ध विहारातील सर्व संस्था पदाधिकारी, श्रीधर सुरवसे, मनियर यांनी सहकार्य केले या कार्यक्रमाला लातूर शहरातील बौद्ध उपासक-उपासिका आणि बहुजन हिताय वसतिगृहातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## सकाळ होईल आणखीनच स्पेशल! थंडगार वातावरणात झटपट घरी बनवा राजवाडी गरमागरम चहा, नोट करून घ्या रेसिपी

राज्यासह संपूर्ण देशभरात मुसळधार पाऊस पडत आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे सगळीकडे थंडगार वातावरण झाले आहे. थंडीच्या दिवसांमध्ये प्रत्येकाचा काहींना काही गरमागरम पदार्थ खाण्याची इच्छा होते. याशिवाय नाश्त्यातील पदार्थांसोबतच सगळ्यांचं वाफाळता चहा हवा असतो. अनेक लोक सकाळी उठल्यानंतर ग्रीन टी, ब्लॅक टी किंवा लेमन टी पितात. मात्र कायमच कमी साखरेचा चहा पिऊन कंटाळा आल्यानंतर काहींना नवीन पदार्थ चाखण्याची इच्छा सगळ्यांचं होते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला थंडगार वातावरणात राजवाडी चहा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. सोशल मीडियाच्या माध्यमातून जगभरातील अनेक नवनवीन पदार्थ चर्चेत येत आहेत. नेहमीच चहापेक्षा काहीतरी वेगळं हवे असल्यास तुम्ही राजवाडी चहा बनवून पिऊ शकता. हा चहा बनवताना अनेक वेगवेगळ्या मसाल्यांचा वापर केला जातो. राजस्थानच्या राजवाड्यांतून लोकप्रिय असलेला चहा जगभरात त्याच्या खास सुगंधासाठी ओळखला जातो. चला तर जाणून घेऊया राजवाडी चहा बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: पाणी साखर चहा पावडर बडीशेप काळीमिरी लवंग वेलची दालचिनी आलं दूध केशर काड्या गोकुळाष्टमीच्या दिवशी नैवेद्यातील पदार्थांमध्ये बनवा मनमोहक पारंपरिक मोहनथाळ, नोट करून घ्या गोडाचा पदार्थ कृती: राजवाडी चहा बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात पाणी गरम करण्यासाठी ठेवा. पाण्याला एक उकळी आल्यानंतर त्यात साखर टाकून चमच्याने मिक्स करून घ्या. त्यानंतर त्यात चहा पावडर घालून उकळी काढून घ्या. मिक्सरच्या भांड्यात बडीशेप, काळीमिरी दाणे, लवंग, छोटी हिरवी वेलची, दालचिनीचा तुकडा आणि आलं घालून बारीक वाटून घ्या. तयार करून घेतलेली पेस्ट उकळत्या चहामध्ये टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. त्यानंतर चहा मंद आचेवर उकळी येण्यासाठी ठेवा. सगळ्यात शेवटी चहाला उकळी आल्यानंतर त्यात दूध आणि केशर काड्या टाकून पुन्हा एकदा उकळी काढून गॅस करा.

## शरीरात कशी होते Cancer ची सुरुवात? कोणकोणते आहेत टप्पे? वेळीच जाणून घ्या आणि स्वत:चे रक्षण करा

कॅन्सर हे असे एक नाव आहे जे ऐकले की मनात भीती निर्माण होते. कारण स्पष्ट आहे ही एक अशी व्याधी आहे जी शरीराच्या कोणत्याही भागात हळूहळू वाढू शकते आणि योग्य वेळी निदान व उपचार न झाल्यास जीवघेणी ठरू शकते.

कॅन्सरची सर्वात मोठी अडचण म्हणजे सुरुवातीला याचे लक्षणे अतिशय सौम्य असतात. लोक ती लक्षणे दुर्लक्षित करतात. पण जर सुरुवातीच्या अवस्थेतच कॅन्सर लक्षात आला तर रुग्णाचे आयुष्य वाचवणे शक्य असते. म्हणूनच डॉक्टर कॅन्सरला वेगवेगळ्या टप्प्यांत विभागतात, ज्यामुळे रुग्ण आणि त्याच्या कुटुंबीयांना आजाराची स्थिती आणि योग्य उपचार समजावून घेणे सोपे जाते.



कॅन्सरचा पहिला टप्पा (डीरसश १)

या टप्प्यात कॅन्सरची सुरुवात होते. उदाहरणार्थ, स्तन कॅन्सरमध्ये स्तनात एक छोटी गाठ तयार होऊ शकते.

या वेळी गाठीचा आकार साधारणपणे २ सें.मी. पेक्षा लहान असतो.

कॅन्सर फक्त त्याच जागी मर्यादित राहतो, तो शेजारच्या ऊतींमध्ये पसरत नाही.

रुग्णाला मोठी वेदना किंवा असामान्य लक्षणे जाणवत नाहीत.

नियमित तपासणी किंवा स्क्रीनिंगमुळे या टप्प्यात कॅन्सर सहज ओळखता येतो.

या स्तरावर उपचाराची यशस्वी होण्याची शक्यता खूप जास्त असते.

कॅन्सरचा दुसरा टप्पा (डीरसश २)

या टप्प्यात गाठीचा आकार २ सें.मी. पेक्षा मोठा होतो.

कॅन्सर थोडा सक्रिय होतो, तरीसुद्धा तो मुख्यतः त्याच भागापुरता मर्यादित असतो.

रुग्णाला गाठ किंवा सूज जाणवू शकते.

काहीवेळा वेदना, थकवा किंवा शरीरातील विचित्र बदल दिसू शकतात.

या अवस्थेत उपचार शक्य असतात, मात्र आव्हान डीरसश १ पेक्षा जास्त असते.

सर्जरी, रेडिएशन किंवा औषधोपचारांचा उपयोग केला जातो.

कॅन्सरचा तिसरा टप्पा (डीरसश ३)

या अवस्थेत कॅन्सर मूळ जागेहून बाहेर पडून लसिका ग्रंथींमध्ये (श्रृाहि पेवशी) पोहोचतो.

आता तो फक्त एका गाठीपुरता मर्यादित राहत नाही, तर शरीराच्या इतर भागांवरही परिणाम करू लागतो.

गाठीचा आकार मोठा होतो आणि असामान्य बदल स्पष्ट दिसतात.

हा टप्पा गंभीर मानला जातो आणि उपचार प्रक्रिया लांब व कठीण असते.

उपचार लांबविल्यास कॅन्सर लवकरच चौथ्या टप्प्यात पोहोचतो.

कॅन्सरचा चौथा टप्पा (डीरसश ४)

हा टप्पा सर्वात गंभीर व धोकादायक असतो.

कॅन्सर मूळ ठिकाणाहून बाहेर पडून शरीरातील महत्त्वाच्या अवयवांपर्यंत (उदा. फुफ्फुसे, यकृत, हाडे, मेंदू) पसरतो.

या अवस्थेत आजारावर नियंत्रण ठेवणे कठीण होते.

उपचाराचा उद्देश प्रामुख्याने रुग्णाची वेदना कमी करणे आणि आयुष्य शक्य तितके वाढवणे हा असतो.

याला प्रगत टप्पा असेही म्हणतात.

वेळेवर निदान का गरजेचे?

कॅन्सरची खरी जाणीव हीच आहे की, जर सुरुवातीला तो ओळखला गेला तर रुग्णाचे आयुष्य वाचवण्याची शक्यता अत्यंत जास्त असते. पण उशीर झाल्यास उपचार कठीण आणि खर्चिक होतात. या गोष्टी ध्यानात ठेवा

नियमित आरोग्य तपासणी आवश्यक आहे.

शरीरात गाठ, सूज, दीर्घकाळ चालणारी खोकला, थकवा यासारखी लक्षणे दुर्लक्षित करू नयेत.

कुटुंबात आधी कुणाला कॅन्सर झाला असेल तर विशेष काळजी घ्यावी.

कॅन्सरवर मात करण्यासाठी वेळेवर ओळख आणि उपचार हेच सर्वात मोठे शस्त्र आहे.

## रेणापूर येथील धुमाकूळ घालणाऱ्या वानरांचा आ. कराड यांनी सूचना देताच केला बंदोबस्त

लातूर : - रेणापूर शहर व परिसरात गेल्या काही दिवसांपासून वानरांच्या टोळीने धुमाकुळ घातल्याने नागरिकात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. वन्य प्राण्याकडून कुठलाही अनर्थ घडू नये यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी वन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या. आ. कराड यांच्या सूचनेची दखल घेऊन रेणापूर शहर आणि परिसरातील वानरांना पकडून वन विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जेरबंद केले आहे.

रेणापूर शहर परिसरातील बसस्थानकाच्या पाठीमागील संभाजी नगर, संजय नगर व बाजार पेठेत गेल्या काही दिवसापासून दहा ते बारा वानरांच्या या टोळीने चांगलाच धुमाकूळ घातला. या वानरांनी आक्रमक होत हल्ला करून दहशत निर्माण केली. घराच्या छतावरून उडी मारून साहित्याची नासधूस करणे, हाकलण्यासाठी आलेल्या महिला व पुरुषांच्या अंगावर धावून येणे. यामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते या सर्व प्रकाराची माहिती मिळताच लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना वानराचा बंदोबस्त करावा अशा सूचना दिल्या.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या सूचनेची तात्काळ दखल घेऊन वन विभागाचे वन परिमंडळ अधिकारी सहदेव पांचाळ, वनरक्षक तुकाराम दिघोळे, यांच्यासह विश्वनाथ मुंडे, नारायण चेपट, अंगद धायगुडे, लिंबराज जाधव, नागनाथ खाडप, कृष्णाजी घोडके, श्रीमंत चेपट, बळीराम शिंदे, समाधान बनसोडे, शिवाजी कांबळे व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या पथकाने कार्यतत्परता दाखवून रेणापूर शहर




आणि परिसरातील धुमाकूळ घालणाऱ्या अनेक वानरांना पकडून त्यांना जेरबंद केले आहे सदरील कारवाई झाल्याने रेणापूर येथील ग्रामस्थात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रेणापूर तालुक्यातील अनेक गावात वन्यप्राण्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होत असून अशावेळी तातडीने वन्य प्राण्याचा बंदोबस्त व्हावा यासाठी रेणापूर येथे वनपरिमंडळाचे कार्यालय कार्यान्वित व्हावे यासाठी राज्याचे वनमंत्री गणेशजी नाईक यांच्याकडे मागणी करणार असल्याची माहिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी दिली.

## : गोड, कुरकुरीत बाजारासारखी जलेबी आता घरीच बनवा; सणसमारंभासाठी परफेक्ट डिश!

जलेबी हा भारताचा एक लोकप्रिय आणि सुप्रसिद्ध गोडाचा प्रकार आहे. यात मैदाच्या पीठापासून तयार केलेली कुरकुरीत जलेबी गोड साखरेच्या पाकात बुडवली जाते. कुरकुरीत जलेबीला गोड पाकात बुडवल्याचे संमिश्र चवीला फार अप्रतिम लागते आणि म्हणूनच भारतीयांची ही एक आवडती मिठाई बनली आहे. सध्या सणसमारंभाचा काळ सुरु आहे. श्रावण सुरु असतानाच काही दिवसांतच गणेशाचे आगमण होणार अशात नैवेद्यासाठी जर तुम्ही घरी एक चवदार आणि गोडाचा पदार्थ बनवू इच्छित असाल तर जलेबी तुमच्यासाठी एक चांगला पर्याय आहे.

बाजारात तर जलेबी मिळतेच पण घरी बनवलेली जलेबी ही अधिक ताजी आणि आपल्या आवडीनुसार बनवता येते. जलेबीची रेसिपी फार सोपी आहे, ज्यामुळे तुम्ही घरीच सोप्या पद्धतीने या डिशची रेसिपी ट्राय करु शकता. घरी पदार्थ बनवण्याची फायदा असा असतो की, यात आपल्या हाताची आणि प्रेमाची एक अनोखी चव मिसळली जाते. श्विाय कमी पैशात जास्त प्रमाणात पदार्थ बनवता येतो, ज्याने मन आणि पोट दोन्ही भरलं जातं. चला तर मग जाणून घेऊया जलेबी बनवण्याची एक सोपी रेसिपी.

साहित्य

मैदा - १ कप

कॉर्नफ्लोअर - २ चमचे

दही - ञ कप

पाणी - आवश्यकतेनुसार

बेकिंग सोडा - चिमूटभर

साखर - १ कप

पाणी (पाकासाठी) - ट कप

केशर किंवा पिवळा फूड कलर - चिमूटभर

तूप किंवा तेल - तळण्यासाठी

सकाळ होईल आणखीनच स्पेशल! थंडगार वातावरणात झटपट घरी बनवा राजवाडी गरमागरम चहा, नोट करून घ्या रेसिपी

कृती जलेबी बनवण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात मैदा, कॉर्नफ्लोअर आणि दही घालून नीट मिसळा.

पाणी घालून मध्यम घट्टसर पीठ तयार करा.

पीठ ८-१० तास किंवा रात्रभर आंबायला ठेवा.

कढईत साखर आणि पाणी घालून पाक बनवा.

पाक एकतारी झाला की त्यात केशर/फूड कलर घालून बाजूला ठेवा.

आंबलेले पीठ गुळगुळीत करून त्यात बेकिंग सोडा घाला.

हे पीठ प्लास्टिक बाटलीत किंवा जलेबीच्या





पाईप बॅगमध्ये भरा.

गरम तेल/तुपात गोलाकार आकारात जलेबी घाला.

दोन्ही बाजूने कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या.

गरमागरम जलेबी पाकात १-२ मिनिटे बुडवा आणि मग खाण्यासाठी सर्व्ह करा.

F-Qs (संबंधित प्रश्न)

जलेबी म्हणजे काय?


जिलेबी ही एक गोड, कुरकुरीत आणि साखरेच्या पाकात घोळवलेला एक गोड पदार्थ आहे.

जलेबीची उत्पत्ती कुठून झाली?

जिलेबीची उत्पत्ती भारतीय उपखंडात झाली असे मानले जाते आणि ती पर्शियन मिष्टान्न, झलाबीपासून प्रेरित असल्याचे मानले जाते.

## वयाच्या आधीच होताय म्हातारे? सफेद केसांमुळे हैराण! ‘हे’ घरगुती उपाय ठरतील रामबाण, त्वरीत करा सुरू

सध्या आपले जीवन हे धावपळीचे बनले आहे. आपल्या धावपळीच्या जीवनात आपल्या आहाराच्या वेळा नीट पाळल्या जात नाहीत. त्यामुलेया सर्वांचा परिणाम आपल्या शरीरावर , आरोग्यावर होत असतो. पोषक तत्वे शरीरात न गेल्याने केस गळणे, पांढरे होणे आणि अन्य काही आजार होण्याची शक्यता असते. बदलती आणि धावपळीची लाइफस्टाइल यामुळे कमी वयातच लोकांचे केस पांढरे होत आहेत. या समस्येने अनेकजण त्रासलेले आहेत. चला तर मग आज आपण काही घरगुती उपाय पाहूयात, ज्यामुळे केस पांढरे होण्याचे, गळण्याचे प्रमाण कमी होईल.



केसांमुळे आपले सौंदर्य वाढते असे म्हटले जाते. मात्र हल्लीच्या जीवनशैलीमुळे कमी वयातच लोकांचे केस सफेद होताना दिसून येतात. कमी वयात केस पांढरे होणे म्हणजे केसांना आवश्यक तत्वे मिळत नसल्याचे लक्षण आहे. मात्र काही घरगुती उपायांमुळे केस काळे, दाट करू शकता. ते घरगुती उपाय कोणते आहेत, त्याबद्दल आपण जाऊन घेऊयात.

कांद्याचा रस: पांढरे झालेले केस काळे करण्यासाठी तुम्ही कांद्याचा रस हा एक घरगुती उपाय करू शकता. कांद्याच्या रसामध्ये असलेले एंजाइम केसांसाठी फायदेशीर ठरते. यामुळे केसांमधील मेलेलीन वाढवून पांढऱ्या केसांना काळे करण्यासाठी मदत करते. कांद्याचा रस काढून तो केसांना लावावा. त्यानंतर ३० मिनिटांनी केस शाम्पू लावून स्वच्छ पाण्याने धुवावेत.

नारळाचे तेल व कडीपत्ता: पांढरे झालेले केस काळे करण्यासाठी कांद्याच्या रसाऐवजी तुम्ही कडीपत्ता आणि नारळाचे तेल देखील वापरू शकता. कडिपत्त्यामध्ये असणारे अँटीऑक्साइड्स आणि व्हिटॅमिन केसांना पांढरे होण्यापासून बचाव करते. कडीपत्ता नारळाच्या तेलात बुडवून ते तेल गॅसवर उकळावे. गार झाल्यावर केसांना लावावे. ते रात्रभर केसांना लावून झोपावे.

मेहंदी आणि कॉफीचा पॅक: कमी वयात पांढरे झालेले केस काळे करण्यासाठी तुम्ही मेहेंदी आणि कॉफीचा पॅक देखील वापरू शकतो. मेहेंदी पावडरमध्ये उकलली कॉफी मिसळावी. त्याची पेस्ट करून केसांना लावावी. दोन तासांनी केस धुवावेत.

आवळा आणि नारळाचे तेल: तुम्ही तुमचे केस काळे करण्यासाठी तुम्ही आवळ्याचे व नारळाचे तेल केसांना लावू शकता. आवळा केसांसाठी अत्यंत गुणकारी आहे. आवळा आणि नारळाचे तेल एकत्रितपणे केसांना लावल्यास अधिक फायदा होतो. आवळा पावडर नारळाच्या तेलात मिसळून उकळावे. त्यानंतर मिश्रण थंड झाले की आठवड्यातून दोन ते तीन वेळा तुम्ही केसांना लावू शकता.

## वात-पित्त आणि कफदोषावर बाबा रामदेवांचा रामबाण उपाय, वापरणे सहजसोपे

वात-पित्त-कफावर बाबा रामदेवांचे उपाय

घरगुती उपायांनी करा दोष दूर

कसे कराल उपाय

बाबा रामदेव आपल्या इन्स्टाग्राम आणि अनेक कार्यक्रमांद्वारे आयुर्वेदाच्या प्राचीन पद्धती प्रत्येक घरात पोहोचवत आहेत. बाबा रामदेव केवळ त्यांची पतंजली उत्पादने विकत नाहीत तर शारीरिक आणि मानसिक समस्यांवर उपचार करण्यासाठी आयुर्वेदिक उपायांबद्दलदेखील सांगतात. ते त्यांच्या सोशल मीडियावर खूप सक्रिय असतात, जिथे बाबा रामदेव उपाय सांगत असताना त्यांचे व्हिडिओ शेअर करत राहतात. यावेळी बाबा रामदेव यांनी वात, पित्त आणि कफ काढून टाकण्यासाठी रामबाण उपचार सांगितले आहेत. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे शरीरात अनेक समस्या उद्भवतात. यामुळे शरीरातील तीन प्रमुख दोषांचे म्हणजेच वात, पित्त आणि कफ यांचे संतुलन बिघडू लागते. जेव्हा त्यांचे संतुलन बिघडते तेव्हा शरीरात वेगवेगळे आजार सुरू होतात. तर बाबा रामदेवांकडून वात-पित्त आणि कफ दोषांचे संतुलन करण्यासाठी रामबाण उपचार जाणून घेऊया. बाबा रामदेवचे वात-पित्त-कफावर उपाय आयुर्वेदानुसार आपल्या शरीरात तीन प्रमुख दोष आहेत, वात, पित्त आणि कफ. बाबा रामदेव यांच्या मते, शरीरातील दोषांचे संतुलन राखणे केवळ रोगांपासून संरक्षण करण्यासाठीच नाही तर दीर्घायुष्य आणि मानसिक शांतीसाठी देखील महत्त्वाचे आहे. यासाठी बाबा रामदेव यांनी काही नैसर्गिक पद्धती सुचवल्या आहेत, मुळात वात, पित्त आणि कफ हे ज्या शरीरातील भागातून होतात त्यावर काम करणे गरजेचे आहे, सुचवलेल्या पद्धती ज्या खालीलप्रमाणे आहेत. किडनीवरील उपाय बाबा रामदेव यांच्या मते, जर एखाद्याला मूत्रपिंडाचा त्रास असेल तर त्याच्यासाठी दुधीची भाजी खाणे फायदेशीर ठरू शकते. दुधीची भाजी किडनीचे कार्य सुधारण्यासाठी प्रभावी आहे. खरं तर, दुधीमध्ये व्हिटॅमिन सी ते व्हिटॅमिन बी १ पर्यंत अनेक जीवनसत्त्वे आढळतात. याशिवाय, बार्लीच्या अर्तात सत्तूच्या पिठापासून बनवलेली चपाती किडनीच्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर आहे, कारण बार्लीत फायबरचे प्रमाण जास्त असते आणि ते शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. साखर नियंत्रित करण्यासाठी बाबा रामदेव यांनी सांगितले की साखर नियंत्रित करण्यासाठी तुम्ही अर्जुनच्या सालीसह दालचिनीचे सेवन करू शकता. असे केल्याने साखर नियंत्रित होईल. यासोबतच हृदय देखील निरोगी राहील. त्याच वेळी, कच्चे अन्न खाल्ल्याने साखरेची पातळी आणि हृदय निरोगी राहण्यासदेखील मदत होते. सायनस आणि दमा बाबा रामदेव यांनी सायनस आणि दम्यासाठी पतंजलिच्या उत्पादनाबद्दलदेखील सांगितले. त्यांच्या मते, जर एखाद्याला सायनस आणि दम्याचा त्रास असेल तर तो अणुतेल वापरू शकतो. मात्र तुम्ही हे सर्व उपाय करण्याआधी आपल्या डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा.





# जन सुरक्षा कायदा लोकशाहीसाठी घातक ;डॉ. सोमनाथ रोडे

लातूर – साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती समारोप दिनानिमित्त जी २४ वतीने लातूर शहरातील अंजनी सभागृह येथे जनसुरक्षा कायदा लोकशाहीसाठी घातक विषयावर इतिहास तज्ञ तथा विचारवंत सोमनाथ रोडे यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मंचावर कामगार नेते राजकुमार होळीकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. जन सुरक्षा कायदा लोकशाहीसाठी घातक असल्याचे मत यावेळी डॉ. सोमनाथ रोडे यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी जन सुरक्षा कायद्याचे स्वरूप, कलम निहाय विश्लेषण,संभाव्य धोके,आक्षेप,विसंगती या संदर्भात भाष्य केले ते पुढे बोलताना म्हणाले की महाराष्ट्राच्या विधिमंडळात हा कायदा बहुमतने मंजूर करण्यात आला.मार्क्सवादी पक्षाचे आमदार यांच्या व्यतिरिक्त कायद्याला विरोध दर्शवणारी भूमिका




विरोधकांनी मांडली नाही.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला भाषण,अभिव्यक्ती, विचार स्वातंत्र्य दिले आहे. या सर्वावर घाला घालणारा हा कायदा आहे. हा केवळ कायदा नसून फॅसिस्ट विचारसरणी यामध्ये जोडली आहे. या कायद्यानुसार गुन्हा सिद्ध झाल्यास हा गुन्हा अजामीन पात्र आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार सरकार पुढील काळात नक्षलवाद संपणार असेल तर हा कायदाच कशाला आणला आहे. असे परखड मत यावेळी त्यांनी मांडले कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणामध्ये कामगार नेते राजकुमार होळीकर यांनी या कायद्याविषयी सखोल माहिती दिली. कलम १९ आणि २१ नुसार राज्यातील चळवळीवर कशा पद्धतीने धोका व परिणाम होणार आहे यासंबंधी त्यांनी मार्गदर्शन केले ते पुढे बोलताना म्हणाले की एखादी व्यक्ती अथवा संघटना या कायद्यानुसार बेकायदेशीर सिद्ध झाल्यास तीन ते पाच वर्षाची शिक्षा होऊ शकते. सामान्य माणसाच्या प्रश्नासाठी लढणाऱ्या प्रत्येक गोष्टीला बेकायदेशीर ठरवणारा हा कायदा रद्द झाला पाहिजे असे मत यावेळी होळीकर यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमास जी २४ पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अश्रूंना सुद्धा डोळ्यात थांबायला जागा मिळत नाही...! समाजभूषण उत्तम तरकसे

नवी मुंबई:– नेरूळ सेक्टर ०६ येथील त्रिमूर्ती मित्र मंडळ,अखंड हरिनाम सप्ताह,शिव वाहतूक सेवा व त्रिमूर्ती महिला मंडळ यांच्या वतीने २४२५ते २५ असे घरगुती गणपती बाप्पा सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्या स्पर्धेच्या पुरस्कार वितरण सोहळा नेरूळ सेक्टर ०६ नवी मुंबई येथील अंकिता मोटार ड्रायव्हिंग स्कूलच्या कार्यालयात समाजभूषण मा श्री उत्तमराव दासू तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) यांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळ्याच्या कार्यक्रम मोठ्या जल्लोषात पार पडला

सदर कार्यक्रमाच्या दरम्यान मा श्री तरकसे साहेबा चा सन्मान दिलीप आमले (आपला माणूस) रवींद्र म्हात्रे,इमरान,नाईक मुन्नावर माते,राजमनी रॉय, शांताराम टिकेकर,प्रमिला दरेकर,सोनाली हांडे व सुमन शिंदे यांनी सामूहिक



शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व प्रेरणा प्रसंग नावाचे पुस्तक भेट देऊन सन्मान केला

श्री उत्तमराव तरकसे यांनी सदर कार्यक्रमाच्या विचार मंचावरून आपले विचार मांडताना

तुम्ही हसत जगत राहाल तर संपूर्ण जग सुद्धा तुमच्यासोबत हसत राहील...!

नाहीतर ,

अश्रूंना सुद्धा ,डोळ्यात थांबायला जागा मिळत नाही...!

असे प्रबोधनात्मक विचार मांडत लोकांचे वैचारिक परिवर्तन करण्याचे कसोशीने विचार मांडले

सदर कार्यक्रमास नेरूळ व नेरूळच्या परिसरातील २०० ते ३०० भाविक वर्ग व तरकसे साहेबांच्या चाहता वर्ग कार्यक्रमास उपस्थित राहिला होता दिलीप आमले यांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# रुद्रापूर गावावर अतिवृष्टी चे संकट

बिलोली प्रतिनिधी:– बिलोली तालुक्यातील रुद्रापूर गावावर अतिवृष्टीचे संकट कोसळले आहे. मुसळधार पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली असून शेतजमिनी पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे पडझड झालेले घर पाण्याखाली गेलेली शेती गावकरी हालअपेष्टा सांगताना

या नुकसानीची पाहणी करण्यासाठी नुकतेच निवड झालेले रुद्रापूरचे उपसरपंच कमलाकर जमदडे यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी ग्रामसेवक व तलाठी आनंद मोखेडे यांच्याशी संपर्क साधून गावात सर्वेक्षण सुरू केले. घरांचे नुकसान आणि शेतीचे झालेले प्रचंड नुकसान याचा पंचनामा करून तातडीने शासनापर्यंत अहवाल पोहोचवण्याची विनंती करण्यात आली आहे. गावकऱ्यांना सरकारने तातडीने मदत द्यावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. उपसरपंच कमलाकर जमदडे यांनी आश्वासन




दिले की, प्रत्येक प्रभावित कुटुंबासाठी प्रशासनाशी समन्वय साधून मदत मिळवण्यासाठी स्वतः पाठपुरावा केला जाईल उपसरपंच गावकऱ्यांना धीर देताना गावकरी प्रशासनाकडे अपेक्षा व्यक्त करताना

रुद्रापूर गावातील या आपत्तीने ग्रामस्थांचे हाल झाले असून शासनाने तातडीने मदत करावी, हीच गावकऱ्यांची अपेक्षा आहे. बिलोली तालुक्यातील रुद्रापूर गावावर अतिवृष्टीचे संकट कोसळले आहे.

मुसळधार पावसामुळे अनेक घरांची पडझड झाली असून शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत. नुकतेच निवड झालेले उपसरपंच कमलाकर जमदडे यांनी पुढाकार घेत पाहणी केली.

ग्रामसेवक व तलाठी आनंद मोखेडे यांच्याशी संपर्क साधून पंचनामा सुरू करण्यात आला. घरांचे व शेतीचे नुकसान शासनापर्यंत पोहोचवण्याची विनंती केले यावेळी माजी सरपंच अर्जुन शेळके ,माजी सरपंच बाबा नागा शेळके ,माजी उपसरपंच राजू गायकवाड ,माजी उपसरपंच कविता सौ.देविदास डोरणेवाड, माझी उपसरपंच नागनाथ नलगोंडे ,तंटामुक्ती अध्यक्ष गोविंद शेळके, गणेश रुद्राक्ष , सतीश नारलावाड आदींची उपस्थिती होती

## सीएसएमटी स्थानकाबाहेर वाहतूक सुरळीत

मुंबई : प्रतिनिधी मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण द्यावे, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेक. जरांगेंच्या या उपोषणाचा आज मंगळवारी (ता. २ सप्टेंबर) पाचवा दिवस आहे. पण या आंदोलनाबाबत सोमवारी (ता. १ सप्टेंबर) मुंबई उच्च न्यायालयाने परखड मत व्यक्त करत हे आंदोलन आता हाताबाहेर गेल्याचे म्हटले. ज्यानंतर न्यायालयाकडून सरकारला कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. दुपारी ४ वाजेपर्यंत सीएसएमटीतील रस्ते मोकळे झाले पाहिजेत, आंदोलनक आझाद मैदान वगळता इतरत्र कुठेही आंदोलन करताना दिसले नाही पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले. ज्यानंतर मुंबई पोलिसांनी तत्काळ कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. कारण चार दिवसांनंतर सीएसएमटी स्थानकाबाहेरील वाहतूक सुरळीत झाली आहे. मराठा आंदोलक मुंबईत आल्यानंतर त्यांच्यामुळे आझाद मैदान, सीएसएमटी रेल्वे स्थानक, फोर्ट परिसर दणाणून गेला होता. पण हे आंदोलन बेकायदेशीर असल्याचे सांगणारी याचिका वकील गुणरत्न सदावर्ते यांच्याकडून मुंबई न्यायालयात दाखल करण्यात आली आणि या याचिकेवर सोमवारी तत्काळ सुनावणी करण्यात आली. आझाद मैदान सोडून मराठा आंदोलकांनी इतरत्र फिरु नये, असे न्यायालयाकडून स्पष्टपणे सांगण्यात आले. त्यामुळे न्यायालयाच्या निर्देशानंतर आणि मनोज जरांगे पाटील यांनी आवाहन केल्यानंतर सीएसएमटी परिसर मराठा बांधवाकडून हळूहळू रिकामा करण्यात आला. गेल्या काही दिवसांपासून या परिसरातील वाहतूक पूर्णपणे ठप्प होती.

# सत्येच्या केंद्रस्थानी कार्यकर्त्यांना संधी मिळावी म्हणून शिवसेनेशी युती आनंदराज आंबेडकरांनी आपली भूमिका स्पष्ट केली

चिपळूण / प्रतिनिधी :– राजकारणात सत्ता ही अत्यंत महत्वाची असते ज्या समाजाकडे सत्ता असेल तो समाजच आपले प्रश्न सरकार दरबारी नेऊ शकतो, त्याकरता आपल्या समाजातील कार्यकर्ते हे सत्तेच्या केंद्रस्थानी पोहोचले पाहिजेत, एक सामान्य कार्यकर्ता हा खरा लढवय्या योद्धा असतो आपल्या रक्ताच पाणी करून तो पक्षाची सेवा करतो परंतु जर त्याला सत्तेत जाण्याची संधीच दिली नाही तर काय फायदा ? आपल्या समाजाच्या हितासाठी आपले कार्यकर्ते सत्तेत जाणे आवश्यक आहे, २% लोकसंख्या असलेल्या समाजाच्या हाती आज सत्तेच्या चाव्या आहेत परंतु १२% लोकसंख्या असलेला आपला समाज सत्तेपासून कोसो दूर राहिला आहे, इतका मोठा आंबेडकरी समाज हा केवळ गटातटात विखरल्याने आजही आपण सत्तेपासून वंचित राहिलो आहोत, रिपब्लिकन पक्षांच्या त्याच त्याच धोरणांमुळे राजकीय चळवळीला नेहमीच अपयश येत राहील आहे म्हणून आता त्या चौकटीतून बाहेर पडून कार्यकर्त्यांना नवीन संधी निर्माण करून देत त्यांना सत्तेच्या केंद्रस्थानी पोहोचवण्यासाठी शिवसेनेचशी युती करण्यात आली आहे असे आपले परखड व स्पष्ट मत रिपब्लिकन सेना पक्षाचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक भवन, चिपळूण येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलत असताना व्यक्त केले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले असता सर्वच पक्ष आपले दंड थोपवट आहेत यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच रिपब्लिकन पक्ष संघटना बळकट करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी रिपब्लिकन सेनाप्रमुख आनंदराज आंबेडकरांनी निवडणूकीच्या आखाड्यात शड्डू ठोकला असून त्यांनी यावेळी शिंदे गट शिवसेनेशी युती केली आहे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांसोबत समनव्य साधण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मेळावा व सभा यांचे आयोजन करण्यात येणार असून त्याद्वारे दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांचे मनोमिलन घडवण्याचे काम करण्यात येईल जेणेकरून दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते एकमेकांना साथ देत जोमाने कार्य करतील असा विश्वास व्यक्त केला तसेच गाव तिथे शाखा व घर तिथे कार्यकर्ता निर्माण करून पक्ष बळकट करण्यावर त्यांचा भर असून पक्ष संघटना बांधणीसाठी नव्याने कार्यकारिणी निवडण्यात येणार असून युतीच्या माध्यमातून शासकीय, अशासकीय समित्यांवर कार्यकर्त्यांना संधी मिळणार असल्याने तसेच शिवसेनेसोबत अनेक विषयांवर समझोता झाला असून आपल्या पक्षाला बऱ्याच ठिकाणी सामावून घेण्यात येणार असल्याने कार्यकर्त्यांनी आलेल्या संधीचे




सोने करावे असे आवाहन ही आनंदराज आंबेडकरांनी केले. सदर मेळाव्या प्रसंगी वंचितचे माजी पदाधिकारी महेश सकपाळ, बुद्धघोष गमरे, विलास मोहिते, विलास जाधव, ॲड. सुयश जाधव, स्नेहा जाधव यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेत प्रवेश केला. सदर मेळाव्यास आनंदराज आंबेडकरांचे सुपुत्र ॲड. अमन आंबेडकर, कोकण प्रदेश अध्यक्ष विनोद मोरे, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, उपाध्यक्ष अशोक कांबळे, अनिरुद्ध कांबळे, गजानन तांबे, अशोक कणगोलकर, सरचिटणीस मिलिंद जाधव, चिटणीस मंगेश पवार, खजिनदार सुरेश मंचेकर, महेंद्र कांबळे, बौद्धजन पंचायत समितीचे खजिनदार नागसेन गमरे, बौद्धजन पंचायत समिती चिपळूण तालुका समन्वयक उत्तम जाधव, अध्यक्ष शांताराम जाधव आणि पदाधिकारी, सभासद त्याचबरोबर रत्नागिरी बौद्धजन पंचायत समिती चिटणीस सुहास कांबळे आणि सर्व पदाधिकारी, भारतीय बौद्ध महासभा, वंचित बहुजन आघाडी, चिपळूण तालुका बौद्धजन हितसंरक्षक समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सोबतच चिपळूण, मंडणगड, खेड, दापोली, संगमेश्वर, रत्नागिरी लांजा येथूनही मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते त्याबद्दल चिटणीस काळेसाहेब यांनी सर्व उपस्थितांना धन्यवाद दिले, सरतेशेवटी सदर मेळावा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष संदेश मोहिते आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे तसेच उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# अज्ञानामुळेच मानवी जीवनात दु:खाचा प्रवेश होतो भंते डॉ.यश काश्यपायन महास्थवीर

लातूर/ प्रतिनिधी :– अज्ञान हेच मानवाच्या दुःखाचे मूळ कारण आहे.आणि अज्ञानामुळेच मानवाच्या जीवनात दुःखाचा प्रवेश होतो. त्यासाठी जीवनातील दुःख समजून घेऊन आपल्याला त्याचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. अज्ञान म्हणजे केवळ माहितीचा अभाव नाही, तर आपल्या जीवनातील गोष्टी आणि वास्तवाकडे दुर्लक्ष करणे होय.असे प्रतिपादन भंते डॉ. यश कश्यपायन महास्थवीर यांनी केले. ते वैशाली बुद्ध विहार बौद्ध नगर लातूर येथे बुद्ध धम्म वर्षावास पुनीत पर्वाच्या निमित्ताने आयोजित धम्मदेशनेच्या कार्यक्रमात बोलत होते.






तत्पूर्वी भगवान बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमाना उपासक–उपासिकांच्या वतीने पुष्प पुष्पमाला अर्पण करून त्रिशरण पंचशील ग्रहण करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विनोद खटके, सुनील कांबळे हे उपस्थित होते. यावेळी बोलताना भंते पुढे म्हणाले कि, माणसाच्या जीवनात दुःख आहे दुःखाला कारण आहे. त्यावर उपाय आहे. दुःखाचा उदयव्यय ही प्रक्रिया अखंड चालू आहे. अज्ञानामुळे दुःख उत्पन्न होते म्हणून या दुःखाला दूर करण्यासाठी आर्य अष्टांगिक मार्ग बुद्धांनी सांगितलेला आहे. त्याचे आचरण करून दुःखाला दूर करा आज आणि उद्या भगवान बुद्धाचा विचार जगाला आवश्यक आहे. त्यामुळेच बुद्धाला डॉक्टरांचे – डॉक्टर म्हटले आहे. ते पुढे म्हणाले कि, अज्ञानामुळे मानवी जीवनात दुःख आहे त्याला कारण आहे घराघरात आई –मुलगा मुलगा –वडील गावा – गावात राज्या– राज्यात देशा –देशात कलह आहे. हा कलह आजचा नाही तर भूतकाळात होता आजही आहे.उद्याही राहणार आहे. त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे कि, विश्वात जो पर्यन्त सूर्य, चंद्र आहे. तोपर्यंत मानवी जग जिवंत राहायचे असेल तर बुद्धाच्या विचाराची कास धरावी लागेल अन्यथा हा कलह या मानवी जीवनाचे काय करेल ते सांगता येत नाही. याकरिता वैराची आवश्यकता नसून मंगल मैत्रीची गरज असल्याचेही आपल्या धम्मदेशनेत भंते कश्यपायन यांनी नमूद केले. यावेळी विनोद खटके, सुनील कांबळे यांच्या हस्ते दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व सुप्रिया सातपुते या समाजशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम आल्याबद्दल बुद्ध पुस्तिका स्मृतीचिन्ह व पुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी भरत कांबळे, सूर्यभान लातूरकर, किशोर कांबळे, कुमार सोनकांबळे, साहित्यिक जी जी कांबळे, आबा गायकवाड, दामू कोरडे, अशोकराव सातपुते, वसंत वाघमारे, उत्तम गायकवाड, राजू कांबळे, असित कांबळे ,शकुंतला नेत्रगावकर ,शीलाताई वाघमारे ,मीना सुरवसे ,अनुराधा कांबळे ,लता गायकवाड ,लता कांबळे ,आशा बानाटे, आशा गायकवाड ,सविता चिकाटे, शारदा वाघमारे, छाया कांबळे इत्यादी उपासक–उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले. तर टि. एस कवठेकर यांनी भोजनदान दिले.शेवटी धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महावितरणच्या कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांचे निलंबन करून कारवाई करण्यात यावी– पत्रकार संघटनेची मागणी

महावितरण कार्यालयाच्या कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांनी स्वतःच्या मोबाईलवर टोपीवाला पत्रकार, बीजली चोर पत्रकार अशा आशयाचे व सदर मजकुराचे स्टेटस ठेवून पत्रकार बांधवांच्या व मुस्लिम समाज बांधवांच्या भावना दुखवून पत्रकारितेचा अवमान केल्याप्रकरणी पत्रकार मुबाशीर खतीब हे २ सप्टेंबर २०२५ रोजी संबंधित कनिष्ठ अभियंता यांचे तात्काळ निलंबन करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासह विविध मागणी संदर्भात महावितरण कार्यालय उपविभागीय येथे आमरण उपोषणाला बसणारा आहेत तर त्यांच्या या उपोषणाला पाठिंबा देऊन केज येथील प्रत्येक पत्रकार संघाचा दररोज पाठिंबा देऊन साखळी उपोषण करण्याचे शासकीय विश्रामगृह येथे केज येथील पत्रकार बांधवांनी बैठक घेऊन सदर बैठकीत वरील प्रमाणे ठरवले आहे.

केज/प्रतिनिधी केज येथील महावितरणच्या कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांचे निलंबन करून कारवाई करण्यात यावी अशी लेखी निवेदनाद्वारे केज येथील पत्रकार संघटनेच्या वतीने पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्याकडे मागणी केली आहे. बातमी प्रकाशित केल्याचा राग मनात धरून कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांनी सोशल मीडिया वरून स्वतःच्या मोबाईलवर स्टेटस ठेवून पत्रकाराची बदनामी व वैयक्तिक



भावना दुखावल्या आहेत या प्रकरणी केज येथील पत्रकार संघटनेच्या वतीने केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे, तहसीलदार केज, उपअभियंता महावितरण कार्यालय उपविभाग केज यांना निवेदनाच्या प्रती देऊन कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांचे निलंबन करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांनी स्वतःच्या मोबाईलवर स्टेटस ठेवून पत्रकार गोल टोपीवाला पत्रकार वीज चोर असा अपमानास्पद स्वतःच्या मोबाईलवर मजकूर ठेवून जिम्मेदार कर्मचारी कनिष्ठ अभियंता यांनी आमच्या सहकारी पत्रकाराचा अवमान व सामाजिक भावना दुखवतील अशा आशयाचे प्रयत्न केल्यामुळे सदरील कनिष्ठ अभियंता शितल सय्यद यांचे निलंबन करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अशा आशयाचे व मागणीचे पत्रकार संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात आलेले आहे. या लेखी निवेदनावर ज्येष्ठ पत्रकार हनुमंत भोसले, धनंजय कुलकर्णी, अशोक सोनवणे, दशरथ चवरे, वसंत सोनवणे, तात्या गवळी, विजय अरखडे, अनिल ठोंबरे, अशोक नागरगोजे, साजेद इनामदार, दीपक नाईकवाडी, संजय खळगे, प्रकाश मुंडे, पांडुरंग कसबे, आय. एन.शेख, मुबाशीर खतीब, दिनकर राऊत, बाळासाहेब जाधव, अर्षद शेख, अजिमभाई इनामदार, नंदकुमार मोरे, रमेश इतापे इत्यादी पत्रकार बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE